# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक : 19.05.2024** **वार-रविवार**

----------------------------------------------------------------------------------------------------

1.राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातला प्रचार संपला

2.मुंबईसह १३ लोकसभा मतदारसंघात उद्या मतदान, मतदानाची तयारी पूर्ण

3.निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर निवडणूक आयोगाच्या कारवाईत ८ हजार कोटींचा मुद्देमाल जप्त

4.पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाला दोन जूनपासून पुन्हा प्रारंभ आणि

5.3थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग-सात्विकसाईराज जोडीचा अंतिम फेरीत प्रवेश

**<u>प्रचार पाचवा टप्पा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातला प्रचार काल संध्याकाळी संपला. राज्यात मुंबईतल्या सहा विभागांसह धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे इथल्या १३ जागांवर उद्या मतदान होणार आहे. राज्यातला हा शेवटचा टप्पा आहे. प्रचाराच्या अखेरच्या दिवशीही प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न महायुती आणि महाविकास आघाडीच्या तसंच इतर पक्षांच्या नेत्यांकडून होताना दिसून आला.

**<u>तयारी पूर्ण मोबाईल बंदी</u>**

मुंबईत मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मोबाईलला परवानगी नसल्याची महत्त्वाची आणि स्पष्ट सूचना मुंबई उपनगराचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मुंबई उपनगरात ७ हजार ३५३ मतदार केंद्रे असून आज सर्व मतदान पथकं मतदान यंत्रासह रवाना होतील.

**<u>दिव्यांग मतदान</u>**

मुंबईत उद्या होणाऱ्या मतदानासाठी, ज्या दिव्यांग मतदारांना केंद्रात जाऊन मतदान करायचे आहे. त्यांच्यासाठी बेस्ट उपक्रमाची बससेवा विनाशुल्क उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठी ६०० बस तैनात केल्या जाणार आहेत.

**<u>निवडणूक आयोगजप्त</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईत ८ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये चार हजार कोटी रुपयांच्या अमली पदार्थांसह मनोविकारावरील औषधी पदार्थांचा समावेश आहे. आयोगाकडून मतदारांना दिल्या जाणाऱ्या  विविध प्रकारच्या प्रलोभनाच्या प्रयत्नांवर करडी नजर ठेवली जात आहे.

**<u>आघाडी पत्रकारपरिषद</u>**

युपीए सरकारच्या काळात देशात अन्नसुरक्षा कायदा आणला होता, पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ तसंच वस्तू सेवा कराचा एकच दर लागू करू असं आश्वासन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल पत्रकार परिषदेत दिले. संविधानाने दिलेलं आणि आर्थिक मागास आरक्षण कायम ठेवत, राज्यपातळीवर आरक्षणाविषयी आयोगाच्या शिफारसींनुसार योग्य निर्णय घेऊ असंही ते म्हणाले.

देशातल्या सर्व जातधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमचं सरकार करेल असं शरद पवार यांनी या पत्रकार परिषदेत सांगितलं.

**<u>मप्र मुख्यमंत्री</u>**

काँग्रेस पक्षाला अनेक वर्ष सत्ता भोगूनही गरीबी हटावचे आश्वासन पूर्ण करता आलं नाही, त्यामुळे देशातला मतदार काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडणार नाही असा विश्वास मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी काल व्यक्त केला. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**<u>प्रचार मुख्यमंत्री</u>**

राज्यात महायुतीचं वातावरण आहे त्यामुळे गेल्या निवडणुकीपेक्षा जास्त जागा महायुतीच्या येतील असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता झाल्यावर त्यांनी दादर इथं दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतलं. यावेळी खासदार राहुल शेवाळे उपस्थित होते. मुंबईतल्या सर्व सहा जागांवर युतीचेच उमेदवार येतील असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

**<u>योगी प्रचार</u>**

महायुतीच्या उमेदवारांसाठी काल उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यात धुळे, पालघर, मालेगावात प्रचारसभांना संबोधित केलं. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याअखेर देशात एकच नारा घुमतो आहे ते म्हणजे फिर एक बार मोदी सरकार. त्यामुळे महाराष्ट्रातल्या पाचव्या टप्प्यातल्या सर्व १३ जागांवर महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून देत संसदेत पाठवा, असं आवाहन योगी आदित्यनाथ यांनी खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांच्या प्रचाराची सांगता करताना केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत दहशतवादाला पायबंद बसला असून पाकिस्तान सारख्या राष्ट्राला जरब बसली असं त्यांनी काल नाशिक जिल्ह्यातील मालेगाव इथं सांगितलं.

तर आम्ही राममंदिर उभारण्याचं वचन पूर्ण केलं, जे बोललो ते करुन दाखवलं असं प्रतिपादन महायुतीचे पालघरचे उमेदवार डॉक्टर हेमंत सवरा यांच्या प्रचारसभेत केलं.

**<u>नाशिक</u>**

नाशिकमध्येही महाविकास आघाडी आणि महायुतीने शक्ती प्रदर्शन करून या प्रचाराची सांगता केली. नाशिकमध्ये काल केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले तसेच वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या सभा झाल्या तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघात प्रकाश आंबेडकर, भाजप नेत्या पंकजा मुंडे तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते डॉ. अमोल कोल्हे यांच्या सभा पार पडल्या.

**<u>विठ्ठल दर्शन</u>**

पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची प्रतीक्षा आता संपणार आहे. येत्या दोन जूनपासून विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन सुरू करण्याचा निर्णय पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर समितीनं घेतला आहे. समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी त्याविषयी अधिक माहिती दिली...

**<u>कपाशी बियाणे विक्री</u>**

अकोला जिल्ह्यात कापूस बियाणांच्या विक्रीला कृषी विभागाच्या उपस्थितीत सुरुवात झाली. कडक उन्हातही शेतकऱ्यांनी बियाणांसाठी रांगा लावल्या होत्या. अकोल्यात बहुतांश कोरडवाहू शेती होत असल्यानं शेतकऱ्यांमध्ये बियाणे खरेदीची लगबग सुरू आहे. बहुतांश कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांच्या पसंतीचे कपाशी बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकरी चिंतीत आहे. सध्या कमीत कमी दोन आणि जास्तीत जास्त पाच पाकिटे बियाणे मिळत असल्यानं, जास्त क्षेत्रफळ जास्त असलेला शेतकरी संभ्रमात आहे.

**<u>नाईक कृषी विद्यापीठ</u>**

शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, तो कधी निवृत्ती घेत नाही. अनियमित वातावरणातही विपुल उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करतो असे प्रतिपादन राज्याच्या मृदा आणि जलसंधारण विभागाचे सचिव सुनिल चव्हाण यांनी काल केलं. परभणीतल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि शासनाच्या कृषि विभागाच्या सहकार्यानं काल खरीप पीक परिसंवाद आणि कृषि प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. राज्यातली बहुतांश कोरडवाहू शेती लक्षात घेऊन त्याला पूरक वाण विकसित करावित, सेंद्रीय शेतीला उपयुक्त शिफारशी विद्यापीठाने कराव्यात अशी अपेक्षा चव्हाण यांनी व्यक्त केली.

**<u>बीडहोर्डिंग</u>**

घाटकोपर, मोशी इथल्या फलक दुर्घटनेनंतर बीड शहरातही जिल्हाधिकारी दीपा मुधोळकर-मुंडे यांनी सहा नगरपालिका आणि पाच नगर पंचायती यांच्या मुख्याधिकाऱ्यांना लोखंडी जाहिरात फलक काढण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश दिले आहे आहेत. त्यानुसार, बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी बीड शहरातील ४७ ठिकाणी उभारलेले फलक काढण्यासाठी २४ तासाची मुदत दिली आहे. अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे.

**<u>बीड समाजकंटक</u>**

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून समाजकटंकांकडून समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय नेते, वेग- वेगळ्या समाजाबद्दल आक्षेपार्ह संदेश समाजमाध्यमांवर प्रसारीत केले जात होते.अशा प्रकारे समाजातील सलोखा आणि शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ४२ समाजकंटकांवर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती बीडचे जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली.

**<u>धुळे छापा</u>**

धुळे तालुक्यातल्या वार शिवारात पोलिसांनी छापा टाकून बनावट देशी दारुचा कारखाना उद्ध्वस्त केला. यामध्ये ४ लाख ३० हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आलं असून कारखाना मालकाचा शोध सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<u>रास्तारोको</u>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवलीजवळ जानवली इथं झालेल्या अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी मुंबई गोवा महामार्ग दोन तास रोखून धरला. वाहनचालक पादचाऱ्याला ठोकरून पसार झाला, त्यात पादचाऱ्याचा मृत्यू झाला. मात्र २४ तास उलटूनही पोलिसांना वाहनचालकाला पकडण्यात अपयश आले. त्यामुळे ग्रामस्थांनी महामार्ग रोखला. तहसीलदार दीक्षांत देशपांडे यांच्या शिष्टाईनंतर आंदोलन मागे घेण्यात आलं त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

**<u>बॅडमिंटन</u>**

बँकॉक इथं झालेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रॅनकीरेड्डी यांनी पुरूष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. कालच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात तैवांगच्या जोडीवर २१-११, २१-१२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. आज चीनच्या जोडीशी त्यांचा अंतिम सामना होणार आहे.

तर महिला दुहेरीत तनिषा कॅस्ट्रो आणि अश्विनी पोनप्पा जोडीचा सामना थायलंडच्या जोडीशी झाला. त्यात पराभूत झाल्यानं या दोघी स्पर्धेतून बाहेर पडल्या आहेत.

**<u>सिंधुदुर्ग पाऊस</u>**

सिंधुदुर्ग जिल्हयाच्या कणकवली, सावंतवाडी, कुडाळ तालुक्यात काल मुसळधार पाऊस पडला. त्यामुळं वातावरणात काही प्रमाणात गारवा निर्माण झाला.

**<u>हवामान</u>**

दक्षिण कोकण, मराठवाडा आणि विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उत्तर कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.